भारतीय कृषी क्षेत्रातील कामगिरी आणि समस्या

डॉ. एस.एम.बिराजदार
साहयक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
शांतारामभाऊ घोलप कला विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य
महाविद्यालय, शिवळे, ता.मुरबाड, जि.ठाणे.

गोषवारा:

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. जवळपास ७०% लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार केला असता दोन वेळेचे अन्नाची गरज भागविण्याची क्षमता कृषी या घटकामध्ये आहे. नैसर्गिक प्रतिकुलतेमुळे दिवसेदिवस शेतीमधील उत्पादनाची क्षमता कमी होत आहे. परंतु नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये मोठया प्रमाणात बदल घडवून आणता येतो. शेतीमधील कामगिरी विशेष उल्लेखनिय आहे. त्याचबरोबर अनेक समस्या सुध्दा दिसुन येतात. परंतु शासकिय नवनवीन योजना व धोरणानुसार यामध्ये बदल घडवून आणता येतो.

प्रस्तावना :—

शेती हा भारताचा मुलभूत व प्रमुख उद्योग असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. बहुतांश भारतीय लोक (७०%) आपल्या उपजीविकेसाठी शेती व शेतीशी निगडीत अशा धंद्यांवर अंवलबून असून शेतीवरील हा भार दिवसेंदिवस वाढतच आहे. १९४१ च्या शिरगणतीनुसार शेकडा ६६ लोक शेती आणि संलग्न धंद्यावर उपजीविका करीत होते ही संख्या १९५१ साली ७०% पर्यंत वाढली. सन १९९७ मध्ये शेतीवर अवलंबुन असणाऱ्याची संख्या कामकरी लोकसंख्येच्या ६१% होती. गेल्या पन्नास वर्षात पंचवार्षिक योजनामुळे औद्योगिक व आर्थिक विकास होत असतानाही शेतीवर निर्वाह करणाऱ्यांची संख्या फारशी कमी झालेली नाही, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. भविष्यकाळात आर्थिक विकासची गती वाढुन शेतीवर अवलंबुन असणाऱ्यांची संख्या कमी होईल. परंतु भारताचा आर्थिक विकास पुष्कळ प्रमाणात शेतीच्या विकासावरच अवलंबुन असल्यामुळे भविष्यकाळातही शेतीला अत्यंत महत्व राहणार हे उघड आहे. भारतीय जनतेला अन्न व उद्योगधंदयांना कच्चा माल पुरविण्याची जबाबदारी भारतीय शेतीवर आहे. भारताच्या निर्यात व्यापारास शेतीच्या मालाला बरेच महत्व आहे. शेतीच्या उत्पन्नावरच सरकारी उत्पन्न बऱ्याच प्रमाणात अवलंबून असते. भारताच्या आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने शेतीला अत्यंत महत्व आहे.

वैशिष्टे :—

१) भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व अभ्यासणे.
२) शेतीविषयक प्रमुख मुलभूत प्रश्नांचे अभ्यास करणे.
३) शेतीची कामगिरी विषयक अभ्यास करणे.
४) कृषी क्षेत्रातील रोजगार अभ्यास करणे.
५) पीकरचनाचे अभ्यास करणे.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व

भारतीय अर्थवस्थेत शेतीला अन्यन साधारण असे महत्व प्राप्त झोले आहे. उपजीविकेसाठी व रोजगारांची संधी मिळवून देणारा घटक म्हणून याकडे पाहिले जाते. आर्थिक विकासाची गती ही शेतीवरच अवलंबुन आहे. अनेक उद्योगधंद्याना कच्चा माल पुरवणारा घटक म्हणून महत्वाचा काम करतो. १९९८—९९ साली राष्ट्रीय उत्पन्नाचा २९.२ उत्पन्न भारताच्या शेतीतून निर्माण झाले. शेतीच्या उत्पन्नावरच सरकारी उत्पन्न अवलंबून असते. एखादा वर्षी शेती बुडाल्यास त्याचा सरकारी अंदाज पत्रकावरही महत्वाचा परिणाम होतो. तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाल्यास त्याचा उद्योगधंदे व व्यापारावरही अनिष्ठ परिणाम झाल्याशिवाय राहत नाही म्हणून शेतीला अत्यंत महत्व आहे.

भारतीय शेतीची जमीन

भारताच्या ३२.९ कोटी हेक्टर जमिनीपैकी ९२.७% जमिनीचे म्हणजे ३०.५ कोटी हेक्टर जमिनीचे मापन करण्यात आले आहे. त्या जमिनीचा उपयोग पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

जमिनीचा उपयोग

	हेक्टर	शे. प्रमाण
जमिनीचे एकूण क्षेत्रफळ	३०.०५	१००.०
जंगलव्याप्त जमीन	०६.०८	२२.००
लागवडीसाठी वापरता न येणारी जमीन	०४.९४	१४.०५
पडीक जमीन	०१.०४	०५.०६
लागवडीखाली नसलेली इतर जमीन	०३.९६	११.०५
लागवडीखाली असलेली जमीन	१४.०२	४६.०४
दोनदा पिके काढण्यात येणारी जमिन	०४.४३	१४
पिके काढण्यात येणाऱ्या जमिनीचे क्षेत्रफळ	१८.६३	६०.०४

संदर्भ — Indian Agri. In Brief 1999 ministry of agri. Govt. of India.

पिके काढण्यात येणाऱ्या जमिनीचे एकूण क्षेत्रफळ १८.६३ कोटी हेक्टर आहे भारताची लोकसंख्या १९९१ साली स्थुलमानाने ८४.४ कोटी धरल्यास पिकाखाली असलेल्या जमिनीचे दरमाणसी प्रमाण ०.२१ हेक्टर येते.

कृषी क्षेत्रातील कामगिरी

भारतीय जमिनीत अनेक तऱ्हेची पिके घेतात. लागवडीखाली असलेल्या एकूण जमिनीच्या जवळजवळ ७७% जमिनीत अन्नधान्याची पैदास करण्यात येत असून उरलेल्या शे. २३% जमिनीत व्यापारी पिके काढण्यात येतात. अन्य पिकांमध्ये तांदुळे, ज्वारी, बाजरी, मका, तूर, डाळी इ. ही अन्नपिके प्रमुख आहेत. व्यापारी पिकामध्ये ऊस, भुईमूग, कापूस इ. पिके उल्लेखनीय आहेत.

शेतीचा मुलभूत प्रश्न

शेती हा भारताचा प्रमुख धंदा. परंतु हा धंदा धंदयांचा तत्वाप्रमाणेच चालविण्यात आलेला दिसून येत नाही. बहुतांश शेतकरी अर्धपोटी राहत असून अत्यंत दरीद्रयावस्थेत जगत आहेत. भारताला पुरेसे अन्न आज भारतीय शेतीतून निर्माण होत नाही व दिवसेंदिवस अन्नासाठी आपल्याला परकियांच्या तोंडाकडे पाहावे लागत आहे. तसेच आपल्या उद्योगधंदयाना लागणारा कच्चा माल पुरविण्यासाठी भारतीय शेती आज समर्थ नाही. अन्नधान्य व कच्चा माल यांच्या आयातीवर भारताचे कोटयावधी रुपये खर्च होत आहेत. औद्योगीकरणासाठी लागणारी मुल्यवान अशा रितीने वाया जात आहे. शेती हा ज्याचा मुख्य धंदा आहे. अशा राष्ट्रासाठी ही अत्यंत

लाजीरवाणी परिस्थिती आहे. भारताच्या शेतीची आजच्या दुरावस्था नीट समजुन घेऊन योग्य पुर्नघटना केली तरच भारताचा आर्थिक विकास होऊ शकेल.

कृषी क्षेत्राची भूमिका :—

१) भांडवलनिर्मितीला हातभार :— विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये केला जाणारा एकमेव मोठा व्यवसाय या नात्याने शेतीची भांडवलनिर्मितमधील भुमिका अतिशय मोलाची ठरु शकेन. जोपर्यंत इतर क्षेत्रे सक्षम होऊन त्यामधून पुरेसे भांडवल निर्माण घेत नाही तोपर्यंत हे काम शेती करु शकते. याचे कारण म्हणजे तौल निकटदृष्टया कमी गुंतवण करुन शेतीची उत्पादकता बरीच वाढविता येते. व त्यातुनच क्षेत्रांच्या विकासाठी भांडवल उपलब्ध होऊ शकते.

२) मनुष्यबळाचा पुरवठा :— श्रम मुबलक असणाऱ्या देशात इतर क्षेंत्राना मनुष्यबळ पुरविण्याचे कार्य शेतीचे क्षेत्र करु शकते. देशाच्या विकास प्रकियेमध्ये शेतीशिवाय जी इतर क्षेत्रे विकसित होऊ लागतात त्यांना श्रमाची गरज भासते. जर ही आवश्यक श्रमशक्ती शेतीमध्ये उपलब्ध नसती तर इतर क्षेत्रांपुढे समस्या निर्माण झाली असती विकासपुर्व स्थितीत शेती हाच एकमेव मोठा व्यवसाय असतो, आणि पर्यायी रोजगाराच्या अभावी बहुसंख्या श्रमिक तेथेच काम करतात.

३) आर्थिक समानता :— जगामध्ये आंतराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावर आर्थिक विषमता वाढत आहे. ज्या देशात शेती हा प्रमुख व्यवसाय असतो तेथे बहुसंख्य जनता ग्रामीण भागात वास्तव करते. अर्थात तेथील आर्थिक विकासाचा मूळ प्रश्न ग्रामीण विकास हा असतो. ग्रामीण भागातील शेती या मुख्य व्यवसायचा विकास झाला तर ग्रामीण भागाचाही विकास होऊन आर्थिक विषमता कमी होऊ शकते.

४) सामाजिक महत्व :— आर्थिक विकास आणि शहरीकरण यांचा निकटचा संबंध आहे. खेडयातील लोक रोजगाराच्या शोधात शहरात स्थंलातरीत होतात व शहरांची अफाट वाढ होते. वस्तुत: विकासाच्या प्रक्रियेत खेडे नष्ट होणे अपरिहार्य नाही. ग्रामीण भागामध्ये ग्रामोद्योग व प्रक्रिया उद्योग यांना चालना दिली तर तेथील लोक विस्थापित होणार नाही.

५) वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा :— अन्नधान्य ही मनुष्याची प्राथमिक गरज आहे. विकासाच्या काळामध्ये लोकसंख्येत वाढ येत असताना जर देशातील शेतीतून पुरेसे अन्नधान्य निर्माण झाले नाही तर त्यांच्या किंमतीत वाढ होऊन सर्व जनतेला त्रास सहन करावा लागेल. देशात अन्नधान्य न्याचा पुरेसा पुरवठा नसला तरी आयातीद्वारे गरज पूर्ण करता येते असे म्हणता येतो परंतु अपवादात्मक स्थितीत हे ठिक आहे. अन्नधान्यसारख्या अत्यावश्यक गरजेबाबत परावंलबित असणे मात्र योग्य नाही.

६) उद्योंगासाठी कच्चा माल :— देशातील अनेक उद्योंगाना लागणारा कच्चा माल शेतीचे क्षेत्र पुरविते. कापड, साखर, ज्युट, चहा इ. उद्योग शेतीशिवाय वाढु शकत नाहीत. विशेष म्हणजे शेतीमधील उत्पादनांचे पर्यायी उपयोग ही शोधले जात आहेत.

७) निर्यातीमधील महत्व :— विकासाच्या प्रारंभिक काळात निर्यात उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीची भरीव मदत होऊ शकतो. कमी विकास झालेल्या देशात शेती हा मुख्य व्यवसाय असतो. विकासाच्या दृष्टीने इतर व्यवसाय सुरु होणे आवश्यक असते तरी प्रगत तंत्रज्ञाने, यंत्रे, कच्चा माल इ. कमतरतेमुळे ते शक्य नसते. त्यांची आयात विकसित देशांमधुन करावी लागते व त्यासाठी परकीय चलनांची गरज भासते. जर शेतीचे उत्पादन वाढवून ते निर्यात केले तर प्राप्त होणारे परकीय चलन आवश्यक अशा विकास आयातीसाठी वापरता येते.

८) इतर काही क्षेत्रांचा आधार :— देशातील उद्योगांप्रमाणेच व्यापार, दळणवळण आणि वाहतूक यासारख्या क्षेत्रांनाही शेतीचा आधार असतो. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये रोजगार वाढतो शेतीच्या आधारे

चालणारे निरनिराळे पुरक उद्योग ग्रामीण क्षेत्रात रोजगार व उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरतात.

भारतीय शेतीची कमी उत्पादकतेची कारणे :—

भारतीय शेतीची उत्पादनक्षमता कमी असल्याचे कारण भारताच्या जमिनीची परिस्थिी हे तर आहेच परंतु त्याचबरोबर शेतमालाच्या विक्रीबाबतच्या व इतर बाहय अडचणीही कारणीभूत आहेत. शेतीची कमी उत्पादकतेची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) जमीनव्यवस्था :— स्वातंत्र्यापुर्वी कुळांना पुरेसे सरंक्षण नव्हते व त्यामुळे त्यांना शेतीतून जास्तीतजास्त पीक काढण्यासाठी उत्तेजन मिळत नसे. दरवर्षी कुळे बदलविण्याच्या पध्दतीमुळे शेत करणारा जमिनीची कायम स्वरुपाची कोणतेही सुधारण करण्याचा प्रयत्न करित नसे. स्वातंत्र्यनंतर कुळांना संरक्षण व स्थैर्य देण्यासाठी विविध कायदे करण्यात आले असून कुळांना उत्पादन वाढविण्याला उत्साह वाटेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

२) शेतीचा आकार :— भारतातील शेतीचा सरासरी आकार साधारणत: ३ हेक्टर असला तरी काही भागांत अर्ध्या हेक्टरापेक्षाही लहान शेत आढळून येते. जमिनीचे विभाजन व अपखंडन मोठया प्रमाणात झालेले असल्यामुळे शेतीचा आकार लहान झाला आहे. यामुळे शेतीच खर्च वाढून उत्पादकता कमी झाली आहे.

३) लागवड पध्दती :— सतत कसण्यात येत असल्यामुळे भारतातील बहुतांश जमिनीचा कस कमी झाला आहे. खतपाणी व रासायनिक द्रव्य वापरुन जमिनीचा कस टिकविण्याचे आर्थिक सामर्थ्य भारतीय शेतकऱ्यांच्या ठिकाणी नाही. चांगल्या बी — बीयाणांचा व आधुनिक अवजरांचा पुरेसा पुरवठा नाही. तसेच शेतीचे कामे करणारे जनावरे धडधाकट व कार्यक्षत नाहीत. फारच थोडया जमिनीवर दोनदा पिके घेण्यात येतात. तसेच अलटून पालटून पिके घेण्याचा प्रघातही कमी आहे. यामुळे शेतीची उत्पादकता कमी झाली आहे.

४) भांडवलाचा पुरवठा :— शेतकऱ्याला शेतीच्या कामासाठी लागणारे भांडवल पुरविणाऱ्या संख्या अजुनही ग्रामीण विभागात पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. बहुतांश शेतकरी सावकारांवरच अवलंबुन असून भरसमाट व्याज देता देता मेटाकुटीला आलेले आहेत. या परिस्थितीत नवीन यंत्रे व तंत्रांचा वापर करुन उत्पादन वाढविण्याला शेतकरी असमर्थ आहेत. व याबाबत त्यांना उत्साह नाही.

५) पाणी पुरवठा :— पाणी हेच शेतीचे जीवन आहे. योग्य वेळी व पुरेशा प्रमाणात पाण्याचा पुरवठा झाल्यास भरघोस पीक येऊ शकते. भारताच्या लागवडीखालील जमिनीपैकी फक्त शेकडा २८% जमिनीला कालव्याचे पाणी मिळते. बाकीच्या जमिनीला अनिश्चित व अपुऱ्या अशा पावसाच्या पाण्यावर अवलंबुन राहावे लागते. सिंचनाच्या सोयीही भारताच्या निरनिराळया भागात अत्यंत विषम प्रमाणात उपलब्ध आहेत.

६) शेतमालाची विक्री :— गोदामांची व वाहतुकीची पुरेशी सोय नसल्यामुळे शेतकऱ्यांना माल विकून टाकावा लागतो. प्रमाणित वतने व मापे आणि वर्गवारी फारच थोडया ठिकाणी अस्तित्वात आहेत. यामुळे शेतकरी फसविल्या जातात व दलालांचा फायदा होतो. या परिस्थितीमुळे शेतीची उत्पादकता वाढविण्यात मुळीचे उत्तेजन मिळत नाही.

कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना :

भारतीय शेतीची उत्पादकता कमी असल्याने त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर फार वाईट झालेले दिसते. शेतीची उत्पादकता वाढविण्यास खालील उपाय योजना आखणे आवश्यक आहे.

१) **उत्पादन तंत्राचा व यंत्राचा वाढता वापर** :— भारतीय शेती ही परंपरागत पध्दतीने केली जाते त्याचप्रमाणे भारतीय शेतकरी हे गरीब असल्यामुळे ते जुन्याच अवजाऱ्यांचा साहयाने शेती करतात. त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी असते जर नवीन यंत्राचा व तंत्राचा वापर केल्यास शेतीचे उत्पादकता वाढु शकते.

२) **शेती विषयक संशोधन** :— शेतीचे उत्पादकता वाढविण्यासाठी शेती संशोधनाला विशेष महत्व देण्यात आले आहे. नविन लागवाडीच्या पध्दतीचा वापर केला पाहिजे.

३) **पीक संरक्षण** :— पीकाचे संरक्षण करणे हे एक भारतीय शेतीची उत्पादकता वाढवण्याचे कारण आहे. पीकावरील वारंवार पडणारे रोग किटकापासून त्यांचे संरक्षण केल्यास शेतीची उत्पादकता वाढविता येते.

४) **पाणी पुरवठयाचा सुविधा** :— पाणी पुरवठयाच्या सोयी व्यवस्थित रितीने केल्यास शेती उत्पादकास वाढविण्यास साहय होते. कालवे, विहिरी इ. द्वारे शेतीस पाणी पुरवठा उपलब्ध करुन दिल्यास उत्पादकता वाढविता येते.

५) **प्रशिक्षण आणि भेट योजना** :— शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी प्रशिक्षण आणि भेट योजना शासनाने सुरु केला आहे.

६) **जमिनसुधारणा** :— शेतीच्या उत्पादकता वाढविण्यासाठी जमिनीची पत योग्य रीतीने ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी जमिनीची वेळोवेळी मशागत करणे आवश्यक आहे.

७) **पतपुरवठयासाठी सोय** :— शेतीतून उत्पादकता घेण्यासाठी पैशाची आवश्यकता अत्यंत गरजेची आहे. जर पतपुरवठयाच्या सोयी जर मोठया प्रमाणात उपलब्ध झाल्यास शेतीची उत्पादकता वाढविता येते.

८) **बाजारपेठयांचा विस्तार** :— शेतमालाला बाजार पेठेची आवश्यकता असते. कारण शेतमाल हे जास्त दिवस टिकु शकत नाही. त्यामुळे बाजार पेठेमध्ये लवकर घेऊन जाणे आवश्यक असते. बाजार पेठेची शेतमालाल मिळवून दिल्यास त्याचा विस्तार होऊन उत्पादकता वाढविण्यास मदत होते.

९) **कृषी संशोधन** :— शेतीला स्वंयपूर्ण राहण्याकरिता व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून शेती केल्यास त्याची उत्पादकता वाढविता येते.

१०) **प्रगत क्रांतीचा विस्तार** :— शेतीमध्ये क्रांती करण्याची जी पध्दत म्हणजे उदा. आधुनिक बि—बियाणे, खते इ. यंत्रसामुग्रीचा वापर मोठया प्रमाणात करुन शेतीची उत्पादकता वाढविता येते.

सारांश :—

भारतीय कृषी क्षेत्रातील कामगिरी आणि समस्या याचा अभ्यास केल्यानंतर असे निष्कर्ष आढळून येतो. भारतीय कृषी क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय आहे. पूर्वीच्या परंपरागत शेती पेक्षा आधुनिक शेतीच्या कस शेतकरी मोठया प्रमाणात स्विकारुन उत्पादनामध्ये भर घालत आहे. इतर प्रगत राष्ट्रांची तुलना केल्यास भारतीय कृषी क्षेत्राची कामगिरी चांगले प्रकारचे आहे असे दिसून येतो. कृषीमधील अनेक समस्यावर मात करुन नवीन तंत्रज्ञानाचा स्विकार केलेला आहे. म्हणून भारत हा देश कृषी प्रधान म्हणून ओळखता जातो

संदर्भ सूची :—

१) भोसले, काटे (२००५) विकास आणि पर्यावरण फडके प्रकाशन कोल्हापूर.
२) गंगाधर वि. कायंदे पाटील (२००४) कृषीचे अर्थशास्त्र चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.
३) ल.ग.बापट व ग.ल. अभ्यंकर (१९८०) भारतीय आर्थिक विकास व समस्या, साहित्य प्रसार केंद्र, नेहरु मार्ग, नागपूर.
४) एस.एस. अट्रावलकर (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था, सेट प्रकाशन, मुंबई.
५) कविमंडन विजय (२०११) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन निराली प्रकाशन,मुंबई.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com